वाचले:-

1. आदेश क्र. साप्रवि/६/कावि/३०५/२०२४ दि.११/०६/२०२४
2. प्रशासन अधिकारी, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय यांच्या कडील पत्र क्र.वायसीएमएच/०४/कावि/१४६२/२०२६ दि.०७/१०/२०२६
3. श्री. गौरव विष्णू कांबळे ह्यांचे जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक : SER/70972/2026 दि. १५/०९/२०२६
4. आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/४५८/२०२६ दिनांक ०३/१०/२०२६
5. सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १९ / ११ /२०२६ रोजीचा मान्य प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
क्रमांक साप्रवि/६अ/कावि/४७५ /२०२६
दिनांक २० / ११ /२०२६

विषय :- श्री. **गौरव विष्णू कांबळे**, शिपाई यांची नियुक्ती नियमित करणेबाबत ...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर श्री. गौरव विष्णू कांबळे यांची वाचले क्र.१ चे आदेशान्वये एस-1 वेतनश्रेणी र.रु.१५०००-४७६०० या वेतनश्रेणीत "शिपाई" या पदावर रुजू तारखेपासुन प्रथमत: ९ वर्ष परिवीक्षाधीन कालावधीकरिता आदेशामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहुन पुर्णत: हंगामी स्वरुपाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार श्री. गौरव विष्णू कांबळे हे दिनांक १२/०६/२०२४ रोजी सामान्य प्रशासन विभागात "शिपाई" या पदावर रुजू झाले आहेत. श्री. गौरव विष्णू कांबळे यांचा "शिपाई" पदावरील परिवीक्षाधीन कालावधी दिनांक ११/०६/२०२५ रोजी संपुष्टात आला आहे.

प्रशासन अधिकारी, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय यांनी उपरोक्त वाचले क्र.२ च्या पत्रान्वये श्री. गौरव विष्णू कांबळे यांचा कामकाज अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये श्री. गौरव विष्णू कांबळे यांचे परिवीक्षाधीन कालावधीमधील कामकाज, हजेरी व वर्तणुक समाधानकारक आहे व त्यांच्या विरुध्द सद्यस्थितीत कोणतीही खातेनिहाय चौकशी चालु अथवा प्रस्तावित नाही, असे नमूद केले आहे. तसेच त्यांची "शिपाई" पदावर नियुक्ती नियमित करणेस स्पष्ट शिफारस केली आहे. उपरोक्त वाचले क्र.३ अन्वये श्री. गौरव विष्णू कांबळे ह्यांनी जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक : SER/70972/2026 दि. १५/०९/२०२६ रोजी सादर केल्यामुळे सदर उमेदवारास नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार त्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या दिनांकापासून नियमित करणे आवश्यक आहे.

सबब मी सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, उपरोक्त वाचले क्रमांक ४ अन्वये प्राप्त अधिकारानुसार श्री. **गौरव विष्णू कांबळे** यांना शिपाई पदावर देण्यात आलेली नियुक्ती, मुळ नियुक्ती आदेशातील अटी व शर्तींचे अधिन राहुन जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या दि. १५/०९/२०२६पासून नियमित करण्यास या आदेशान्वये मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद उपरोक्त कर्मचा-याचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

Digital Signature
Signature Valid
Name : AJINKYA YE
Designation:Assistant Commissioner
Location:.
Date :19-11-2026 19:24

प्रती - 1) गौरव विष्णू कांबळे

प्रत - 1) १. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३.साप्रवि टेबल क्र. ७,१०,१२,२१ ४. सामान्य प्रशासन विभाग- संगणक कक्ष ५. संबंधित विभागप्रमुख----------